## त्याग

कळले सारे मला, न सांगता तू
मिटलेल्या डोळ्यांत तुझ्या का दाटलेत अश्रुबिंदू

सांगू कशा तुला मी मनातील भावना
कोंडलेल्या श्वासांना माझ्या वाटहि मिळेना

दुभंगलेल्या स्वप्नांचा भारहि साहेना
साठलेल्या दुःखाचा बांधहि फुटेना

गळून पडलेल्या फुलांचा गंधहि उडेना
जुन्या आठवणींचा विसरहि पडेना

असून डोळे उघडे काहीहि दिसेना
विचार करूनहि त्यातून मार्ग सापडेना

तुटून पडलेल्या भावनांना अंतहि मिळेना
मिटलेल्या नयनांतुनी अश्रुहि निघेना

उघडलेल्या मुखांतून शब्दहि उमटेना
हृदयात तेजाळलेली ज्योतहि विझेना

समजावून देण्यास तुला, शब्द सापडेना
थोपविण्यास तुझ्या अश्रूंना साथहि मिळेना

विसर सारे तू, आवर तुझ्या भावनांना
रात्र रात्र जागेन मी मोजीत चांदण्यांना

■

– पद्माकर चित्रे

('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)